# प्रकरण चार

## एकात्मिक बालविकास विभाग

**4.565 जिल्हा परिषद योजना अंतर्गत अंगणवाडीना साहित्य पुरविणे या योजनेअंतर्गत वजनकाटे पुरविणे, वाडा क्रमांक 1 केलेल्या खर्चाबाबत. (जिल्हा परिषद निधी)**

**पंचायत समिती वाडा, जिल्हा पालघर**, **सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10**) **-** पंचायत समिती वाडा, यांच्या अंतर्गत एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांनी जिल्हा परिषद निधीतुन वजनकाटे खरेदी वर रुपये 1,11,870/- खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) रुपये 1,11,870/- आहरीत करण्यात आली असुन सदरची रक्कम रुपये 990/- प्रमाणे प्रत्येक अंगणवाडी केंद्रावर वर्ग करण्यात आली असुन सदर वजनकाट्याची किमंत रुपये 990/- कशाच्या आधारे ठरविण्यात आली.

2) Success Computers अधिकृत पुरवठादार असल्याचे पडताळणी होत नाही.

3) खरेदी केलेले वजनकाटे हे वजनमापे व गुणनियत्रंण कार्यालयाकडुन प्रमाणित करून घेण्यात आलेले नाहीत.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय, परास/1089/646/266/3, दिनांक 29/07/1989 अन्वये साहित्य वाटपानंतर फलश्रूती अहवाल सादर केलेला नाही.

**4.566 पंचायत समिती सेस अंतर्गत इयत्ता 5 वी ते 10 वी पर्यंत शिकणाऱ्या मुलींसाठी सायकल पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती बागलाण**, **जिल्हा नाशिक, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 20) -** पंचायत समिती सेस अंतर्गत इयत्ता 5 वी ते 10 वी पर्यत शिकणा-या मुलीसाठी सायकल पुरविणेसाठी रूपये 2,10,529/- एवढा खर्च करणेत आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती महिला बालकल्याण विभागाने मास्टर नोंदवही (लाभार्थी) ठेवलेली नसल्याने लाभार्थींना दुबार लाभ दिलेला आहे किंवा कसे, लाभार्थी कुटुंबापैकी कोणीही सदस्य अंगणवाडी सेविका, मदतनीस, शासकीय निमशासकीय कर्मचारी यापैकी नसलेबाबत प्रमाणपत्र घेतलेले नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/ प्र.क्र.446/वित्त-9,दिनांक 20/06/2008 अन्वये योजनेचे नियोजन आणि अंमलबजावणी नमुद वेळापत्रकानुसार राबविणेत आलेली नाही.

3) पंचायत समितीतील मासिक सभेतील ठरावानुसार योजनेची निवड करणेत आलेली असून लाभार्थींची निवड यादी नाही. पुरवठादाराकडून राष्ट्रीयीकृत बँकेची 10 टक्के रकमेची बँक गॅरेंटी प्राप्त करणेत आलेली नाही. योजनेची निवड करताना लाभार्थ्यांच्या मागण्या घेतलेल्या नाहीत.

4) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखंस-1088/(2512) नुसार उद्योग-6,दिनांक 02/01/1992 मधील परिच्छेद 8.6 नुसार साहित्य योग्य दर्जाचे प्राप्त झालेबाबत प्रमाणपत्र नमूद केलेले नाही. साहित्याचा दर्जाबाबतचा चाचणी अहवाल प्राप्त नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1093/प्र.क्र.1239/34,दिनांक 01/01/1993 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले त्याच वित्तीय वर्षात साहित्य वाटप होणे आवश्यक असताना लेखापरीक्षण कालावधीपर्यंत सायकलीचे वाटप ही पुढील अर्थिक वर्षात करण्यात आलेले आहे. तसेच सक्षम अधिकारी यांनी पहाणी करुन सायकलीचा उपयोग शैक्षणिक सुविधेबाबतचा अहवाल दप्तरी नाही.

6) सायकलीचे वाटप इयत्ता 5 वी ते 10 वी पर्यतंच्या मुलीना लाभ देय असतांना प्रस्तावात खालीलप्रमाणे अनियमितता झालेल्या आहे.

1) कु.गायकवाड मेधा भावराव - अंतराबाबत दाखला स्वाक्षरी नाही.

2) माधुरी गरलु साबळे - मुख्याध्यापक यांचा शिकत असलेबाबत दाखला नाही.

3) ज्योती सुरेश पाटील - मुख्याध्यापक यांचा शिकत असलेबाबत दाखला नाही प्रस्तावात व्यवसाय मजुरी.

4) शितल बाळु चव्हाण - शाळेचे अंतर 1 कि.मी.

5) अश्विनी प्रभाकर गागुंर्डे इयत्ता 4 शिकत आहे.

6) राहीणी मधुकर गांगुर्डे इयत्ता 4 शिकत आहे.

अनुक्रमांक 3 ते 6 लाभार्थ्याकडून लाभाची रक्कम वसुलीस पात्र ठरते.

**4.567 पंचायत समिती सेस अंतर्गत बिस्कीट व पोषणकल्प पावडर खरेदी करणेबाबत.**

**पंचायत समिती चांदवड, जिल्हा नाशिक, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 25) -** पंचायत समिती सेस अंतर्गत बिस्कीट व पोषणकल्प पावडर खरेदी करणेसाठी रूपये 1,97,610/- खर्च करणेत आलेले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर बिस्कीट / पोषणकल्प पावडर नमुने घेण्यात आलेली नाही. तसेच चाचणी अहवाल हा केंद्रीय तपासणी प्रयोगशाळा यांचेकडून घेणे आवश्यक आहे. परंतु अहवाल पुरवठादार यांनीच सादर केला आहे. त्यामुळे गुणवत्ता दर्जा यांची खात्री होऊ शकली नाही.

2) सदरील बिस्कीट / पोषणकल्प पावडर लाभार्थ्यांना वाटप केल्यानंतर योजनेचा फलनिष्पत्ती अहवाल ठेवणेत आलेला नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या लेखासंहिता 1968 नियम 98 सक्षम अधिकारी हे साठा नोंदवहीतील शिल्लक परिमाण व भांडारातील परिमाण यांची नियमितपणे पडताळणी करुन तसा संबधित साठा नोंदवहीत प्रमाणपत्र देतील. तथापि, अशा प्रकारे साठा पडताळणी केल्याचे साठा नोंदवहीत आढळून आलेले नाही.

4) श्रेणी वर्धनासाठी कोणता आहार योग्य राहील, अशा प्रभावी आहाराची निवड बालरोग तज्ञामार्फत करण्यात आली किंवा कसे याबाबतची खात्री होऊ शकली नाही.

5) प्रकल्प अधिकारी यांनी पोषण आहार साहित्याचा वाटप व विनियोग दाखला व उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

6) कुपोषण कमी करण्यासाठी आहार पुरेसा नसल्याने कुपोषित मुलामुलींसाठी पुरविण्यात येणाऱ्या आहाराव्यतिरिक्त विशेष आहार म्हणून स्थानिक उपलब्धतेनुसार दूध, अंडी, फळे, गुळ, शेंगदाणे इत्यादी वस्तुंचा पुरवठा करण्यात यावा असे आदेश असतांना तशी कार्यवाही करण्यात येत नाही.

7) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखंस-1088/(2512) नुसार उद्योग-6, दिनांक 02/01/1992 मधील परीच्छेद 8.3 (ड) नुसार रुपये 50,000/- व त्या पेक्षा जास्त रक्कमेच्या साहित्याची खरेदी वृत्तपत्रात जाहिर प्रसिध्दी देवुन निविदा मागवून करणे आवश्यक असतांना साहित्याची खरेदी दरपत्रके मागवुन केलेली आहे.

8) प्रकल्पाचे साठा नोंदवही लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही.

**4.568 कुपोषित मुलांना आहार व औषधे वाटपातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती जुन्नर, जिल्हा पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 50) -** पंचायत समिती जुन्नर उपकर निधीतून 12 अंगणवाडीमधील 79 कुपोषित मुलांना प्रत्येकी रुपये 1,200/- प्रमाणे कुपोषण मुक्त करणेसाठी रक्कम रुपये 94,800/- संबंधित अंगणवाडीचे खात्यावर वर्ग केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर रक्कम संबंधित अंगणवाडी कडे वर्ग केल्याची कागदपत्रे प्रमाणकासोबत जोडली आहेत. परंतु सदर रकमेतून कोणता खर्च केला याबाबतचा तपशील प्रमाणाकासोबत जोडलेला नाही.

2) सदर योजना राबविताना अंगणवाडी पर्यवेक्षिका यांचेकडून कोणत्याही अंगणवाडीमधील कुपोषित मुलांची माहिती मागविलेली नाही. तसेच रक्कम वर्ग केल्यानंतर संबंधित मुलाला कोणते उपाय केले यामध्ये औषधे अथवा

सकस आहार देण्यात आला याबाबतची कागदपत्रे प्रमाणकासोबत जोडली नसल्याने रकमेचा विनियोग बाबत पडताळणी करता आली नाही.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/प्र.क्र.1239/34, दिनांक 01/09/1993 नुसार संबंधित लाभार्थीची प्रकृतीबाबत अहवाल तयार करणे आवश्यक असताना अहवाल सादर केलेला नाही.

**4.569 50 टक्के पंचायत समिती उपकर निधीमधून पॉलिसेट पालिसेट प्लास्टीक बेबी चेअर्स पुरवठा करणे मधील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती दौंड, जिल्हा पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 71) -** पंचायत समिती दौंडचे सन 2014-2015 मध्ये 50 टक्के पंचायत समिती उपकर मधून पॉलिसेट पालिसेट प्लास्टीक बेबी चेअर्स पुरवठा करणे खर्च रक्कम रुपये 199924/- पॉलिसेट प्लास्टीक प्रा.लि. यांचेकडून 1360 नग प्रती नग रुपये 147/- प्रमाणे खुर्च्या खरेदी केल्या आहेत. त्यांनंतर त्याच विक्रेत्याकडून प्र.क्र.30, दिनांक 30/03/2015 रोजी रक्कम रुपये 1,76,904/- च्या 1200/- नग बेबी चेअर्स (खुर्ची) खरेदी केल्या आहेत. त्याअनुषंगिक प्रमाणक क्रमांक 14 दिनांक 5/12/2014 याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस/1088/ (2512) उद्योग 6,दिनांक 02/01/1992 नुसार रुपये 50,000/- चे वरील खरेदी असलेने वर्तमानपत्रात जाहीरात देवून निविदा मागविणे आवश्यक होते परंतु स्थानिक वर्तमान पत्र बारामती प्राईड ला जाहीरात देवून खरेदी केली आहे. त्याच प्रमाणे उपरोक्त प्र.क्रं. 30 दिनांक 30/03/2015 रोजी 1200 खुर्चीची खरेदी विना जाहिरात देवून त्याच विक्रेत्याकडून खरेदी केली आहे.

2) नस्ती सोबत प्रशासकिय मान्यतेचे व तांत्रिक मान्यतेचे आदेश नाहीत व तांत्रीक मान्यतेचे आदेश नाहीत.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/ प्र.क्र.680/वित्त-9, दिनांक 31/01/2013 नुसार प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देणेचे अधिकार पंचायत समिती स्तरावर गट विकास अधिकारीयांचे आहेत परंतु सदर बाबत प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेचे आदेश नस्ती सोबत दिसून येत नाही.

4) सदरच्या बेबी चेअर्स अंगणवाडयांना पुरवठा करणेत आला असून बिटनिहाय वाटप पर्यवेक्षिका यांना देणेत आल्या आहेत. प्रत्यक्ष अंगणवाडयांना पुरवठा केले बाबत अंगणवाडयाकडील पोहच व निनियोग दाखले घेणेत आले नाही.

5) पुरवठा आदेश गट विकास अधिकारी पंचायत समिती दौंड क्रमांक एका.बाविसे/दौंड/347 /2014,दिनांक 05/09/2014 नुसार पुरवठा आदेश देणेत आला आहे. परंतु किती नगाचा पुरवठा करणेचा आहे हे नमुद नसलेने केलेला पुरवठा योग्य असले बाबत पडताळणी करता आली नाही.

6) प्रमाणक क्रमांक 30 दिनांक 31/03/2015 नूसार 1200/- नगाचा पुरवठा आदेश नस्ती सोबत नाही.

**4.570 पंचायत समिती महिला सदस्यांचे अभ्यास दौ-यासाठी केलेल्या खर्चातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती बारामती, जिल्हा पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** पंचायत समिती बारामती यांनी उपकर निधीतून पंचायत समिती महिला सदस्यांच्या अभ्यास दौ-यासाठी प्रमाणक क्रमांक 29,दिनांक 31/03/2015 अन्वये रूपये 2,95,000/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रमविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए-10/2001 व शासन परिपत्रक, ग्रामविकास विभाग क्रमांक एजीटीडी 1079/सीआड़-46142, दिनांक 15/01/1980 तसेच परिपत्रक क्रमांक झेडपीए 1004/44 मंत्री/प्र.क्र.23/म. रा.1 मुंबई, दिनांक 26/07/2004 अन्वये सहलीमधील सदस्य 45 असावे व प्रती माणसी खर्च रूपये 2,000/- तसेच एकूण 60,000/- इतकी मर्यादा घालून दिली आहे. तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2013/प्र.क्र.76/पंरा-1 दिनांक 24/01/2014 अन्वये वार्षिक खर्च

मर्यादा 5 लक्ष करणेत आलेली आहे. उपरोक्त दिनांक 24/01/2014 चे शासन परिपत्रकान्वये प्रती सहलीचा खर्च रूपये 60,000/- मर्यादित असताना रूपये 2,95,000/- इतका खर्च करण्यात आलेला आहे जादा खर्च रक्कम रुपये 2,35,000/-वसुल करुन उपकर निधीत भरणा करावा.

2) उपरोक्त नमुद दिनांक 20/02/2001 चे परिपत्रकामधील अट क्रमांक 2 अन्वये सहलीसाठी भाड्यापोटी एस.टी/बस ने प्रवास करणेचा असताना विमानाने केलेला प्रवास खर्च मान्य करता येत नाही व अट क्रमांक 4 नुसार जेवण व निवासाचा खर्च सहलीत भाग घेणा-या व्यक्तींनी स्वतः करावयाचा असताना पंचायत समिती निधीतून रूपये 17,252/- हा केलेला खर्च मान्य करता येत नसल्याने उपकर निधीत वसुल करुन भरणा करावा.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मध्ये एखाद्या रकमेचा अग्रीम देणेबाबत तरतूद नसताना सदर सहलीसाठी श्री.मोरे, एस.बी. महिला बाल कल्याण प्रकल्प अधिकारी यांचे नावे प्रमाणक क्रमांक 16,दिनांक 13/03/2015 अन्वये रूपये 2,95,000/- अग्रीम नियमबाह्यरित्या देण्यात आला.

4) महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2013/प्रक्र.76/पंरा 1, दिनांक 24/01/2014 अन्वये अभ्यास सहलीमध्ये राज्यांतर्गत व राज्याबाहेर नाविन्यपूर्ण योजनांची माहिती घेणेसाठी अभ्यास दौ-याचे आयोजन करणे आवश्यक होते. परंतू त्याप्रमाणे कार्यवाही न करता विविध प्रेक्षणीय स्थळांना भेटी दिलेल्या आहेत.

5) अट क्र.6,10 व 11 नुसार माननीय आयुक्त व मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सहल आयोजित करणेबाबत मंजुरी घेणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

**4.571 इयत्ता 7 वी ते 12 वी उत्तीर्ण मुलींना टायपिंग प्रशिक्षण अनुदान देणेबाबत.**

**पंचायत समिती हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 17) -** पंचायत समिती हातकणंगले, एकात्मिक बाल विकास सेवा विभागाने पंचायत समिती उपकरातून 7 वी ते 12 वी उत्तीर्ण मुलींना टायपिंग प्रशिक्षण अनुदान देणेकरिता रक्कम रुपये 1,06,850/- इतका खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे या शासकीय संस्थेचा मराठी 30-40 स्पीड करिता प्रवेश शुल्क रक्कम रुपये 100/- व प्रशिक्षण फी रक्कम रुपये 1,500/- असे रक्कम रुपये 1,600/- व इंग्रजी टायपिंग करिता देखील रक्कम रुपये 1,600/- दर निश्चित केला असताना मंजूर टिप्पणी पाहता प्रति लाभार्थी अनुदानाची रक्कम किती देणे आवश्यक आहे हे निश्चित न करता लाभार्थीने टायपिंग प्रशिक्षणाची रिसिट सादर केल्याप्रमाणे अनुदानाचे वाटप केल्याने रक्कम रुपये 29,200/- जादा आदा झाली आहे ती रक्कम संबंधित लाभार्थीकडून वसूल करणे आवश्यक आहे.

**4.572 10 वी व 12 वी पास मुलींना MS-CIT चे प्रशिक्षण देणे योजनेबाबत.**

**पंचायत समिती चंदगड, जिल्हा कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** पंचायत समिती चंदगड यांनी पंचायत समिती उपकरामधून 10 वी व 12 वी पास मुलींना MS-CIT चे प्रशिक्षण देणे योजनेकरिता रक्कम रुपये 72,000/- खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजना राबविताना महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्रं.446/वित्त-09, मुंबई, दिनांक 20/06/2008 नुसार जिल्हा परिषद/ पंचायत समितीने राबविलेल्या विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी मागदर्शक सूचना नमुद केलेल्या असून त्यासोबत परिशिष्ठ क्रं.3 नुसार वैयक्तीक लाभाच्या योजनांमधील लाभार्थ्यांची निवड 31 जुलै अखेर होणे आवश्यक आहे परंतु सदर योजनेच्या नस्तीमध्ये अ.क्र.1 ते 36 नमूद करून त्यात कोणत्याही लाभार्थ्याचे नाव नमूद नसून को-या मंजूर लाभार्थी यादीवर बाल विकास प्रकल्प अधिकारी व गटविकास अधिकारी यांची स्वाक्षरी आहे. तसेच कोणत्याही लाभार्थ्याचा प्रस्ताव उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 27 नुसार आवश्यक असल्याखेरीज धनादेश काढू नयेत असे असताना गटविकास अधिकारी यांचे आदेश क्रमांक एबाविसेयो/वशि/अनुदान/आदेश/15, दिनांक 30/03/2015 अन्वये 36 लाभार्थ्यांना रक्कम रुपये 2,000/- प्रमाणे रुपये 72,000/- आदा करण्यास कळविले आहे व किर्दिस पत्र क्रमांक 29 दिनांक 31/03/2015 अन्वये कोरे धनादेश नमूद करुन पोकळ खर्च दाखविण्यात आलेला आहे. सदरील खर्च रक्कम रुपये 72,000/- वसुल होणे आवश्यक आहे.

3) ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक आरसी-1081/सीआर-1940, दिनांक 14/06/1982 (आवक क्रं.सचिव 944/17/6/82) नुसार आगाऊ धनादेश न काढण्याबाबत स्पष्ट सुचना दिल्या असताना लाभार्थ्यांची निवड न करताच निनावी आगाऊ धनादेश काढलेले आहेत.

4) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2013/प्र.क्र.76/पंरा-1 दिनांक 24/01/2014 अन्वये MS-CIT प्रशिक्षण कार्यक्रम महाराष्ट्र ज्ञान मंडळ (एमकेसीएल) यांचेकडील अधिकृत प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण आयोजित करुन परिक्षा व प्रशिक्षण शुल्क फी आगावू भरावी व प्रथम लाभार्थी निवड करुन सदर प्रशिक्षण संस्थाना आगावू रक्कम आदा करुन प्रशिक्षण पूर्ण करण्याबाबत स्पष्ट सूचना देवूनही त्याप्रमाणे कार्यवाही नाही. प्रत्यक्षात लाभार्थींना नियमबाह्यपणे रोख स्वरुपात रक्कम आदा केली आहे.

**4.573 एकात्मिक बालविकास सेवा योजना कार्यालय मोर्शी येथील अपहाराबाबत. (शासकीय निधी)**

**पंचायत समिती मोर्शी, जिल्हा अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** सन 2014-2015 या वित्तीय वर्षात एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्पं मोर्शी अंतर्गत झालेल्या अपहाराबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) श्रीमती तसरे,सेवानिवृत्त पर्यवेक्षिका यांनी प्रमाणक क्रमांक 12 दिनांक 5/6/2014 रुपये 48,810/- आश्वासित प्रगती योजना बाबतचे देयक सादर केले आहे. तसेच प्रमाणक क्रमांक 13 दिनांक 05/06/2014 रक्कम रुपये 3,76,200/- असा सदर दोनही रकमेचा एकत्रित धनादेश रुपये 4,25,010/- बालविकास प्रकल्प अधिकारी यांना देण्यात आला. सदर देयकांवर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांचे आदेश क्रमांक 1977/10 दिनांक 24/12/2010 नमुद आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 44(2) प्रमाणे सदर प्रकरणी पुन्हा मंजुरी घेणे आवश्यक होते. सदर रकमेचा धनादेश श्री भटकर यांनी बँकेतून वटवून रक्कम वाटप न करता अपहारीत केली आहे.

2) श्रीमती कुसुम वैद्य यांचे अर्जित रजा रोखीकरणाकरीता प्रमाणक क्रमांक 13 दिनांक 05/06/2014 रक्कम रुपये 3,73,200/- आहारीत करण्यात आले आहे. मात्र यापुर्वी प्रमाणक क्रमांक 153 दिनांक 20/02/2013 व प्रमाणक क्रमांक 6 दिनांक 04/06/2013 यानुसार रकमा अदा करण्यात आल्याने एकाच कारणासाठी तीन वेळा रकमा आहारीत करण्यात आल्याने संबधितांनी रकमेचा अपहार केलेला आहे.

3) श्रीमती रेखा गवई यांचे रजा वेतनाकरीता प्रमाणक क्रमांक 23 दिनांक 27/06/2014 रक्कम रुपये 1,39,890/- एवढी रक्कम आहारीत करण्यात आलेली आहे.मात्र सदर कारणाकरीता प्रमाणक क्रमांक 54 दिनांक 08/10/2013 नुसार रक्कम रुपये 1,07,522/- यापुर्वीच अदा करण्यात आलेले असल्याने रकमेचे दुबार प्रदान दर्शवून अपहार करण्यात आलेला आहे.

4) श्रीमती रेखा वानखडे यांचे आश्वासित प्रगती योजनेकरीता प्रमाणक क्रमांक 22 दिनांक 27/06/2014 अन्वये रक्कम रुपये 61,539/- आहारीत करण्यात आलेली आहे. मात्र सदर कारणाकरीता प्रमाणक क्रमांक 47 दिनांक 20/09/2013 नुसार रक्कम रुपये 50,484/- एवढी रक्कम संबंधिताच्या खात्यात जमा करण्यात आल्याने रुपये 61,539/- चा कायम अपहार करण्यात आलेला आहे.

5) श्रीमती रेखा गवई यांचे वैद्कीय प्रतिपुर्ती करीता प्रमाणक क्रमांक 50 दिनांक 09/09/2014 नुसार रक्कम रुपये 92,534/- व प्रमाणक क्रमांक 51 दिनांक 09/09/2014 रक्कम रुपये 97,519 याप्रमाणे रक्कमा आहारीत करण्यात आलेली आहे. मात्र संबधितांनी अनुक्रमे रक्कम रुपये 20,296 व 14,659/- याप्रमाणे रकमेची

मागणी करण्यात आलेली आहे असे असतांनी मागणीपेक्षा जादा रकमेचे आहारण करुन रकमेचा कायम अपहार करण्यात आलेला आहे.

6) श्रीमती शिल्पा गोस्वामी व इतर यांचे सहावे वेतन आयोग थकबाकी करीता प्रमाणक क्रमांक 65 दिनांक 13/10/2014 रक्कम रुपये 3,05,397/- ऐवढी रक्कम आहारीत करण्यात आलेली आहे. सदर रक्कम शिल्पा गोस्वामी व अरुणा ढोंगे या काल्पनिक सेवानिवृत्त पर्यवेक्षिका दर्शवून रकमेचा कायम अपहार करण्यात आलेला आहे.

7) श्रीमती लिला सुखदेवे यांचे आश्वासित प्रगती योजना थकबाकी करीता प्रमाणक क्रमांक 66 दिनांक 13/10/2014 नुसार रक्कम रुपये 66,623/- एवढी रक्कम आहारीत करण्यात आली आहे. मात्र संबधित कर्मचाऱ्यास यापुर्वीच प्रमाणक क्रमांक 83 दिनांक 25/11/2013 नुसार रक्कम अदा करण्यात आलेली असल्याने रकमेचे दुबार प्रदान करुन कायम अपहार करण्यात आलेला आहे.

**4.574 वाहन चालकाची सेवा दुसरीकडे न वापरल्यामुळे शासन निधीचे नुकसान.**

**पंचायत समिती अकोट, जिल्हा अकोला, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** पंचायत समिती, अकोट येथील एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे वाहन चालकाची सेवा दुसरीकडे न वापरल्यामुळे शासन निधी रूपये 3,56,920/- चे नुकसान झाल्याचे आढळते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत आस्थापनेवर वाहन चालकाचे पद मंजूर असल्याने वाहन चालक कार्यरत असून वाहन क्रमांक MH- 04 - 160 निर्लेखनाची प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांना सादर केला आहे. परंतु वाहन चालकाची सेवा इतरत्र वापरत नसल्याने एकात्मीक बालविकास अधिकारी हे वेतनापोटी चालकास दरमहा वेतन रूपये 10,230 ग्रेड वेतन रूपये 2,100 व त्यावरील महागाई भत्ता व इतर भत्त्यासह वेतन आहरीत करीत आहेत. त्यामुळे कामाशिवाय प्रदानास अधिकारी जबाबदारी असून दिनांक 24/09/2013 पासून त्यांची सेवा इतरत्र वापर होईपर्यंत दरमहा वेतन प्रदानाची जबाबदारी निश्चित करून वसूली करावी.

**4.575 इंधन खरेदी व किरकोळ खरेदी मधील अनियमितता.**

**पंचायत समिती आरमोरी, जिल्हा गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** सन 2014-2015 मध्ये पोषण आहार कार्यक्रम अभिकरण निधी अंतर्गत एकुण 58,306/- रूपये इंधन खरेदी व किरकोळ खरेदीवर खर्च करण्यात आलेले आहे. या मध्ये रूपये 38,148/- ला बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक विकास योजना आरमोरी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, गडचिरोली यांचे दिनांक 12/10/1982 चे अधिकाराने, आदेश क्रमांक 157,दिनांक 31/03/2015 अन्वये मंजुरी प्रदान केलेली आहे. प्रमाणक क्रमांक 254, दिनांक 31/3/2015 मधील उपप्रमाणक मे. ओम सर्विस एजन्सी आरमोरी बिल क्रमांक 182, 297 दिनांक 31/3/2015 नुसार डिझेल (56.84 x 600 लिटर) रक्कम रुपये 34,104/- व ऑईल (250 x 6 लिटर) रक्कम रुपये 1,500/- एकुण रुपये 35,604/- ची नोंद डिझेल साठा पणजी क्रमांक 17 वर घेण्यात आलेली आहे. त्याचा वापर पुढील आर्थिक वर्षात सन 2015-2016 मध्ये आवश्यकते नुसार केल्याचे दिसून येते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2014-2015 या आर्थिक वर्षात लेखासंहिता 1968 चे नियम 27 तात्काळ अदायगीसाठी आवश्यकता असले तेव्हाच धनादेशाव्दारे रक्कम काढता येते. असे असुनही केवळ अनुदान व्यपगत होऊ नये म्हणुन डिझेल खरेदी केल्याचे दिसुन येते.

2) डिझेल सारखे ज्वलनशील पदार्थाची सुरक्षा व्यवस्था नसतांना मोठया प्रमाणात खरेदी करून ठेवणे म्हणजे जीवित व वित्तीय आपत्तीस निमंत्रण देण्यासारखेच आहे. त्यामुळे भविष्यात याबाबत दक्षता घ्यावी.

**4.576 पंचायत समिती सेस फंड योजनेअंतर्गत 90 टक्के सुटीवर शिवणयंत्र मशिन पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती देसाईगंज (वडसा), जिल्हा गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदर योजनेची अंमलबजावणी करण्याकरीता पंचायत समिती देसाईगंज, सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 3(1) दिनांक 13/12/2013 नुसार हिमालय कंपनीचे शिवणयंत्र पुरवठा आदेश क्रमांक पंचायत/425/15 दिनांक 23/03/2015 अन्वये स्वस्तीक एंटरप्रायजेस देसाईगंज यांना 10 शिवणयंत्राचे प्रती नग रूपये 4,950/- प्रमाणे रूपये 49,500/- प्रदान केले असुन सदर साहित्याची नोंद साठापुस्तक पृष्ठ क्रमांक 72 ला घेऊन 10 लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर साहित्य खरेदीबाबत तांत्रिक मंजुरी प्राप्त केली नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/5क/446/वित्त9, मंत्रालय मुंबई, दिनांक 20/06/2008 मधिल बाब क्रमांक 3 परिशिष्ट-ई नुसार वैयक्तिक लाभाच्या योजनेची कार्यवाही दिलेल्या वेळापत्रकानुसार कार्यवाही झालेली नाही.

2) लाभार्थ्यांची निवड केव्हा व कधी करण्यात आले याबाबत निवडयादी व ठरावाची प्रत नस्तीत आढळुन आले नाही.

3) 10 लाभार्थ्यांना प्रती लाभार्थी 1 शिवणयंत्र वाटप करण्यात आले असुन लाभार्थ्यांचे स्वाक्षरीसह उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आले नाही.

4) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 83(3) नुसार पुरवठा आदेशानुसार खरेदी केलेल्या 10 शिलाई मशिनची तपासणी केल्याचे अहवाल नस्तीत आढळले नाही.

5) सदर योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची मास्तर नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

6) महाराष्ट्र लघुउदयोग विकास महामंडळ, गडचिरोली यांचेकडून हिमालय शिवणयंत्राचे दरकरार प्राप्त केले नाही.

**4.577 सौ.विभुते प्रमिला शिवशंकर पर्यवेक्षिका मोघा यांचेकडील अपहारीत रक्कम वसुल न केलेबाबत.**

**पंचायत समिती उदगीर, जिल्हा लातूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 23) -** पंचायत समिती, उदगीर, एकात्मीक बाल विकास प्रकल्प कार्यालयाचे सन 2014-15 च्या लेखा परिक्षणात सेवा पुस्तीकेची पडताळणी केली असता खालील प्रमाणे उणिवा आढळुन आल्या. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातुर यांचे आदेश क्रमांक जा.क्र.जिपला बा.क. आस्था/सीआर-74/कावि/122/10 बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, लातूर दिनांक 30/07/2010 अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील / नियम 1964 मधील नियम 4 (5) मधील तरतुदीनुसार संबंधितास सक्तीने सेवा निवृत करण्यात आले असुन अपहारीत रक्कम रुपये 93,566/- त्यांचे देय असलेल्या रक्कमेतुन वसुल करण्यात यावी अशी नोद बालविकास प्रकल्प अधिकारी निलंगा, यांनी सदर कर्मचाऱ्याच्या सेवा पुस्तीकेत नोंद करण्यात आलेली आहे. याबाबत कार्यवाही झालेली नाही.

2) सदरील कर्मचाऱ्यांची सेवा पुस्तीका पडताळणी केली असता सदरच्या नोदी आधारे अदयापही अपहारीत रक्कम रुपये 93,566/- एवढी वसुल करण्यात आलेली नाही. आता संबंधिता कडुन अपहारीत रक्कम वसुलात आणुन शासनखाती त्या त्या लेखा शिर्षाखाली चलनाने भरणा करणे आवश्यक आहे.